# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.06.2025** **वार- रविवार**

---

**पालखी**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेली संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आता दिवे घाटाचा अवघड टप्पा पार करून शिंदेवाडी इथला विसावा घेऊन सासवडकडे मार्गस्थ होत आहे. तर दुसरीकडे संत श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा मांजरीमार्गे लोणी काळभोरच्या मुक्कामी पोहोचत आहे.

पुण्यातील दोन दिवसांचा मुक्काम संपल्यानंतर पालख्या आज पहाटेच्या सुमारास पुणे-सोलापूर रस्त्यामागे हडपसरच्या दिशेने मार्गस्थ झाल्या. आज माऊलींच्या पालखीचा मुक्काम सासवडमध्ये आहे; त्यासाठी सासवड इथला पालखीतळ सुसज्ज करण्यात आला असून मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या ठिकाणी आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. वारकऱ्यांसाठी पिण्याचं स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

माउलींच्या पालखीचा मुक्काम उद्या दिवसभर सासवडमध्ये असेल; त्यामुळे भाविकांच्या सोयीसाठी एसटी तसंच  पीएमपीएमएल बसची सुविधा वाढवण्यात आली आहे. माऊलींच्या पालखीसमवेत पुण्यातील अनेक नागरिकही सासवडपर्यंत जात असतात, त्यांना रात्री परतण्यासाठी देखील अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत.

संत श्री तुकाराम महाराजांची पालखी आज लोणी काळभोर इथं मुक्कामी पोहोचत आहे. यासाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी पालखीतळ, आठवडा बाजार मैदान, गावठाण परिसर, शाळांची मैदानं आणि गावातल्या मंदिरांची स्वच्छता करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या मोफत उपचारासाठी तात्पुरती आरोग्य मदत केंद्रही  उभारण्यात आली आहेत.

**साखरकारखाना**

2024-25च्या ऊस गाळप हंगामात शेतकऱ्यांच्या उसाचे सुमारे 57 कोटी 32 लाख रुपये थकीत ठेवल्या प्रकरणी साखर आयुक्त सिध्दराम सालीमठ यांनी आठ साखर कारखान्यांवर जप्तीच्या कारवाईचे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. पुणे जिल्ह्यातील इंदापूर इथल्या कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याचाही यात समावेश आहे.

**पुणेमनपा**

नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्या सोडवण्यासाठी पुणे महापालिकेत सुरू करण्यात आलेला अभ्यागत कक्ष फक्त सोमवारीच सुरू ठेवण्याचा निर्णय महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला आहे. महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सोमवार आणि गुरुवार असे आठवड्यातून दोन दिवस हा कक्ष सुरू ठेवला होता. मात्र, राम यांनी यामध्ये बदल केला आहे. महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयुक्त, तर पुढच्या तीन सोमवारी अतिरिक्त आयुक्त या अभ्यागत कक्षात उपस्थित राहतील. यापूर्वीच्या तक्रारींच्या अनुभवावरून अतिक्रमण, बांधकाम, पाणीपुरवठा आणि मिळकतकर विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

**पीव्हीजी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, या अभियांत्रिकी महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा बहाल करण्यात आला आहे.  यासंदर्भातील परिषदेची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीला महाविद्यालयाचे संचालक सुनील रेडेकर, परीक्षा नियंत्रक, अभ्यासक्रम मंडळाचे प्रतिनिधी, शिक्षक प्रतिनिधी तसंच विशेष निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

**पुरस्कार**

गानवर्धन संस्थेनं संवादिनी वादक डॉक्टर उपेंद्र सहस्त्रबुद्धे यांचा पंडित अप्पासाहेब जळगावकर संवादिनी वादक पुरस्कार देऊन सन्मान केला. ज्येष्ठ संवादिनीवादक पंडित अप्पासाहेब जळगावकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित ‘सन्मान सुरांचा’ या मैफलीत काल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**सांगीतिककार्यक्रम**

विद्यार्थिप्रिय शिक्षक, समाजधुरीण प्राध्यापक श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त काल पुण्यात विराज जोशी आणि सिद्धार्थ बेलामनू या आश्वासक युवा कलाकारांची गायन मैफल झाली. या कार्यक्रमात श्रीराम पुजारी यांच्या जीवनप्रवासावरील चित्रफित दाखविण्यात आली.

**दत्तकविद्यार्थी**

श्री कसबा गणपती सामाजिक संस्थेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेण्याची योजना गेले 22 वर्षे राबवण्यात येते. या योजनेअंतर्गत वर्ष 2025 मध्ये 125 विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आलं आहे. या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि शालेय साहित्याचं वाटप नुकतंच करण्यात आलं. हे विद्यार्थी पुण्यातील रमणबाग, हुजूरपागा, अहिल्यादेवी आणि विमलाबाई गरवारे अशा अनेक नामवंत शाळांमधील आहेत.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून 80 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. पावसाने उघडीप दिल्याने कोथिंबिरीच्या भावात घसरण झाली तर अन्य पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. फळबाजारात कलिंगड, खरबूज, डाळिंब महागले आहेत. तर फुल बाजारात आवक वाढली असली तरी मागणी नसल्याने फुलांचे दर स्थिर आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसानं विश्रांती घेतली. आज कमाल तापमान 30 आणि किमान तापमान 22 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्या आकाश ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**